# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli

**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**

**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ३१/०८/२०१९

## गडचिरोली पोलीस दलातर्फे पोळा सणानिमित्त बळीराजाचे कौतुक

गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन व त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याच्या उद्देशाने मा. पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या संकल्पनेतुन "पोळा" सणाचे औचित्य साधुन जिल्हाभरात "भव्य बैलपोळा स्पर्धा" आयोजित करण्यात आली.

सदर स्पर्धा गडचिरोली, कुरखेडा, धानोरा, पेंढरी, अहेरी, एटापल्ली, भामरागड, जिमलगट्टा हेडरी तसेच सिरोंचा अशा १० उपविभागिय स्तरावर पार पडली. जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील अनेक शेतकऱ्यांनी सदर स्पर्धेत उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. प्रत्येक उपविभागिय स्तरावर झालेल्या या स्पर्धेत उत्कृष्ठ रंगरंगोटी व सजावट असणाऱ्या प्रथम क्रमांकाच्या बैलजोडीस ३०००/- रु. रोख, व्दितीय क्रमांकास २०००/- रु. रोख, व तृतीय क्रमांकास १०००/- रु. रोख पारितोषिक देवुन सन्मानित करण्यात आले.

पोलीस दलाच्या या नाविण्यपुर्ण कार्यक्रमामुळे जनतेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असुन, पोळा सणानिमित्य शेतकऱ्यांचे व शेतकऱ्यांनी जिवापाड जपलेल्या बैलजोडीचे सन्मान प्रथमच करण्यात आल्यामुळे पोलीस दलाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




